माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये**
**प्राप्त झालेले द्वितीय अपील**

**अपील क्रमांक : २०१७/२०२३**

**अपिलार्थी** – श्री. सुयोग बालाजी बावणे,
रा. प्लॉट क्र. २८, न्यू सहकार नगर, डायमंड नगर बोर्डजवळ, रमना मारोती मंदिराच्या मागे, नागपूर ४४००२४

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**तहसिल कार्यालय, नागपूर शहर, सिव्हील लाईन्स, नागपूर ४४०००१**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार,**
**नागपूर शहर, सिव्हील लाईन्स, नागपूर ४४०००१**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्रधीकाऱ्याच्या निर्णयाचा / आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०३.०४.२०२३ | निरंक | १२.०५.२०२३ | निरंक |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दि.०१.०८.२०२३ रोजी** "माहिती उपलब्ध करून दिली नाही" असे कारण नमूद करून द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपील अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांवरून अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर **प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, नागपूर शहर, सिव्हील लाईन्स, नागपूर ४४०००१** यांनी सुनावणी घेवून निर्णय पारीत केल्याचे दिसून येत नाही.

सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र. केमाअ-२००७/११८२/प्र.क्र.६५/०७/६(मा.अ.) दि. १२.१२.२००७, शासन परिपत्रक क्र. केमाअ-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/६(मा.अ.) दि. ३१.०३.२००८, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१४ प्र.क्र. २४०/२०१४/सहा/दि. १३.०२.२०१५ अन्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेवून आदेश निर्गमित करणे बंधनकारक आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी हे संबंधित प्राधिकरणातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्यावर सुनावणीच्या वेळी ते तोडगा काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भूमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये प्रथम अपिलीय अधिकारी घोषित करण्यात आले आहेत व अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये दाखल करण्यात आलेल्या प्रथम अपील अर्जावर संबंधित प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून निर्णय पारीत करणे आवश्यक आहे. तदनंतर या प्रथम अपिलाच्या निर्णयावर कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल करणे अभिप्रेत आहे.

अत: प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि. १२.०५.२०२३ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दि. ०८.०६.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. मात्र आदेश निर्गमित करण्यात आल्याचे दिसत नाही. त्यामुळे प्रथमत: सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आवश्यक आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(८)(a) व १९(७) अन्वये आयोगास प्राप्त अधिकारान्वये **प्रथम अपिलीय अधिकारी तथा तहसिलदार, नागपूर शहर, सिव्हील लाईन्स, नागपूर ४४०००१** यांना कळविण्यात येते की, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या दि.१२.०५.२०२३ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सदर आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सुनावणी घेवून समन्यायीक निर्णय पारित करण्यात यावा. याकरिता अपिलार्थीस लेखी सूचना देवून सुनावणी आयोजित करावी. सुनावणीची लेखी सूचना संबंधिताना बजावून दोन्ही पक्षाची बाजू ऐकून स्वयंस्पष्ट आदेश पारित करावेत.

प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी जर प्रथम अपील आदेशाद्वारे माहिती देण्याचा निर्णय घेतला तर त्या निर्णयानुसार अपिलार्थीना माहिती विहित करण्यात आलेल्या वेळेत प्राप्त होईल याची प्रथम अपिलीय अधिकारी यांनी खात्री करावी.

अपिलार्थी यांना प्रथम अपिलावरील निर्णय मान्य न झाल्यास / अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोग, नागपूर कार्यालयाकडे द्वितीय अपील करण्याची मुभा राहील. द्वितीय अपील दाखल करताना सदर आदेशाचा संदर्भ नमूद करणे आवश्यक राहील.

**तसेच कळविण्यात येते की, मा. सर्वोच्च न्यायालयामधील मूळ याचिका (सिव्हील) क्र. ९९०/२०२१, दि. १७ ऑगस्ट, २०२३ चे आदेश तसेच सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. रामाआ २०१९/प्र.क्र.१८/सहा, दि. १६.०२.२०२३ अन्वये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४ च्या अंमलबजावणीबाबत सूचित करण्यात आले आहे. त्यानुसार प्रत्येक शासकीय व निमशासकीय कार्यालयामधील स्वयंमप्रेरणेने घोषित करावयाची माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४ अनुसार १७ मुद्द्यांची माहिती वेळोवेळी (दरवर्षी १ जानेवारी व १ जुलै) अद्ययावत करण्यात यावी. तसेच कलम ४ व्यतिरिक्त आपल्या कार्यालयातील स्वयंप्रेरणेने प्रदर्शित करणे आवश्यक असलेली सर्व माहिती आपल्या अधिकृत संगणक संकेतस्थळावर वेळोवेळी प्रदर्शित करण्यात यावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य माहिती आयोगास सादर करण्यात यावा.**

<u>आदेश</u>

उपरोक्त आदेशासह सदर द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(राहुल भा. पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १८.१२.२०२३**

जावक क्रमांक 4088 दिनांक 18 JUL 2024